# ‘स्त्री - आरोग्य’

‘स्त्री प्रजनन आरोग्य’ स्त्रियांच्या प्रजनन आरोग्याबाबत मानवी हक्कांच्या भूमिकेतून शास्त्रीय माहिती देणारा स्लाईड शो.

‘स्त्री - आरोग्य’ या स्लाईड-संचामध्ये तीन उपसंच आहेत. पहिल्या १७ स्लाईड्स ‘मासिक पाळी’ या विषयावर आहेत. स्त्रीच्या जननेंद्रियाची रचना व मासिक - पाळीचे चक्र या बाबत नीट माहिती सांगण्यासाठी ३५ ते ४० मिनिटे लागतात. सोबतच्या मराठी कॉमेंट्रीमध्ये सर्व मुद्दे येतात. पण ते सविस्तररित्या समजावून सांगण्यासाठी वेळ लागतो. शेवटी चर्चा झाली तर एकूण कार्यक्रम तासभर चालतो. शिकलेल्या मुली / स्त्रियांना हा स्लाईड शो कमी वेळात दाखविता येईल. ७ वी, ८ वी च्या मुलींना त्यांच्या एका तासिकेत या १७ स्लाईड्स सर्व माहितीसह दाखविता येईल अशा रितीने स्लाईड्सची संख्या ठेवली आहे.

स्त्रियांबरोबर अनेकदा मुलं असतात या वा अन्य कारणांमुळे एका वेळेस एका तासापेक्षा जास्त वेळ कार्यक्रम ठेऊ नये. १८ ते ४८ या स्लाईड्स गरोदरपण व बाळंतपण यावर आहेत. व त्यापुढील स्लाईड्समध्ये वंध्यत्व, गर्भपात व गर्भनिरोधनाचे उपाय अशांसारखे विषय हाताळले आहेत. त्या त्या गटाच्या गरजेनुसार स्लाईड्स दाखवाव्यात.

सोबत दिलेल्या पुस्तिकेत या संचातील सर्व स्लाईडस् विषयी माहिती दिली आहे. यातील सर्वच्या सर्व माहिती स्लाईड शो दाखवत असताना सांगणे अपेक्षित नाही. मात्र चर्चे दरम्यान एखादी शंका कुणी उपस्थित केल्यास त्याविषयी माहिती स्लाईड शो दाखविणाऱ्या व्यक्तिला असायला हवी. या हेतूने सविस्तर माहिती दिली आहे.

**ऋणनिर्देश-** १९८२ साली लोकविज्ञान संघटनेने केलेल्या ‘स्त्री-आरोग्य’ या स्लाईड-शो मधील कल्पना व सोबतची लिखित कॉमेंटरी यांचा हा स्लाईड-शो बनवतांना मोठ्या प्रमाणावर उपयोग केला आहे. हा स्लाईड-शो म्हणजे ‘लोकविज्ञान’ संघटनेच्या या स्लाईड-शो ची जणू सुधारित आवृत्ती आहे. ही सुधारित आवृत्ती बनवण्याचे काम डॉ. अनंत फडकेंच्या मार्गदर्शनाखाली मुख्यतः डॉ. नीलांगी सरदेशपाण्डे यांनी डॉ. धनंजय काकडे यांच्या मदतीने केले आहे.

या स्लाईड शोमधील चित्रे श्री. चंद्रशेखर जोशी यांनी काढली आहेत. तर संगणकीय जुळणीचे काम श्रीमती शारदा महल्ले यांनी केले आहे. स्लाईड-शोची गुणवत्ता सुधारण्यात भाग्यश्री खैरे व रेणुका मुकादम यांचा बहुमूल्य सहभाग आहे.

पुण्यातील सेहतच्या ‘रीप’ प्रोजेक्टसाठी तयार केलेल्या ‘गर्भपात’ या विषयावरील काही स्लाईडस् व त्या बाबतची कॉमेंटरी, ‘तथापि’ चे आपल्या हातात या पुस्तकातील काही भाग यांचाही या स्लाईड-शो साठी उपयोग केला आहे.

---

**साथी-सेहत**

प्लॉट नं. १४०, ३/४, अमन टेरेस, डहाणुकर कॉलनी, कोथरूड, पुणे- ४११ ०२९

**फोन :** (०२०) २५४५१४१३/२५४५२३२५, e-mail : cehatpun@vsnl.com